# पतसंस्थांविषयी सरकारची भुमिका



महाराष्ट्र राज्यातील २ लाख १८ हजार नोंदणीकृत सहकारी संस्थांपैकी १८ हजाराच्या दरम्यान नागरी / ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था अस्तित्वात आहेत. या पतसंस्थांच्या बाबतीत केंद्र सरकार व महाराष्ट्र राज्य सरकारची भूमिका काय आहे हे राज्यातील १२ कोटी जनतेला माहिती करून देण्यासाठी आमचा सातत्याने प्रयत्न आहे. पुरोगामी शासनाची भूमिका छत्रपती शिवरायांच्या रयतेसाठी पूरक नाही किंबहुना शासन रयतेसाठी बांधील नाही असेच चित्र सर्वत्र दिसते. शासन दुजाभाव करते. जनतेकडून कर रूपाने आलेल्या रकमेचे नियोजन करताना, राज्याचा अर्थसंकल्प मांडताना व मंजूर करताना सुध्दा शासनाची भूमिका ही सातत्याने समाजविरोधी व जनतेची फसवणुक करणारी दिसते आणि असे चित्र सातत्याने महाराष्ट्रा सारख्या राज्यात जनतेला दिसणे ही अत्यंत शरमनाक बाब आहे.

महाराष्ट्र राज्यातील नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंक ज्यावेळेला आर्थिक अडचणीत आली त्यावेळेला त्याची कारण मिमांसा न करता त्या नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेला तत्कालीन राज्याचे मुख्यमंत्री की ज्यांचा जिल्हा नांदेड आहे अशा नामदार अशोकराव चव्हाण साहेबांच्या कारकिर्दीत ११६ कोटी रूपये राज्य शासनाने प्रथम कर्जाऊ दिले. नंतर ही ११६ कोटी रूपयांची कर्जाऊ दिलेली रक्कम ही देणगीत रूपांतरीत केली. हे कृत्य भारताच्या इतिहासात महाराष्ट्राला लागलेला कलंक आहे. केंद्र सरकार किंवा महाराष्ट्र राज्य सरकारचे याबाबतीत कुठलेही ध्ये धोरण नाही. देशातील राज्य बँका / जिल्हा बँका / नागरी बँका / पतसंस्था जर आर्थिक अडचणीत आल्या तर नांदेड जिल्हा बँकेप्रमाणे सर्वांना देणगी म्हणून देशभरासाठी धोरण लागू करावे लागेल. आणि असे जर झाले तर हा देश एक दिवससुध्दा लोकांचे रक्षण करू शकणार नाही. बाब अत्यंत गंभीर आहे.

भारतीय रिझर्व्ह बँकेने याबाबतीत केंद्र सरकार, महाराष्ट्र सरकार व नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेवर काय कारवाई करण्याच्या सूचना दिल्या हे अद्याप जाहीर झालेले नाही. तरी सुध्दा सहकारी चळवळ म्हणून महाराष्ट्र **राज्य सरकारने राज्यातील इतर आर्थिक अडचणीत आलेल्या जिल्हा बँकांना त्या प्रमाणात का देणग्या दिल्या नाहीत ?** न्याय व्यवस्थेपर्यंत ह्याबाबतीत कोणी कशी दाद मागितली नाही ? नांदेड जिल्हा बँकेतील तथाकथीत आर्थिक अडचणीचे मूळ स्वरूप शोधून ते चव्हाट्यावर का आणले नाही ? राज्याच्या विधीमंडळात ह्यावर खऱ्या अर्थाने मोठ्या प्रमाणात चर्चा का झाली नाही ? व जनतेच्या कराच्या पैशाची लूटमार करणाऱ्यांना जेलमध्ये का डांबले नाही ? संबंधीतांची स्थावर – अस्थावर मालमत्ता का जप्त केली

नाही ? यासारखे अनेक प्रश्न महाराष्ट्र राज्यापुढे भविष्यात आव्हान म्हणून उभे राहणार आहेत.

राज्यातील पतसंस्था महाराष्ट्र सरकारकडून सतत बिन पैशाच्या काही मूलभूत प्राथमिक मागण्या करीत आहेत. त्या खालीलप्रमाणे :-

१. थकबाकी वसुली करणेसाठी विशेष कर्ज वसुली व विक्री अधिकारी यांच्याबद्दलच्या कायद्यातील तरतुदीमध्ये बदल करून शैक्षणिक अर्हता व पदाची पात्रता यामध्ये शिथीलता आणणे.

२. मागताक्षणी विशेष कर्ज वसुली व विक्री अधिकारी यांना पोलीस संरक्षण देणे.

३. विशेष कर्ज वसुली व विक्री अधिकाऱ्याने राजमुद्रेचा करावयाच्या वापरासंबंधी भूमिका स्पष्ट करणे.

४. कलम १०१ द्वारे प्राप्त झालेल्या निकालावर अपीलास १०० टक्के मज्जाव आणणे.

५. अपसेट प्राईजला मान्यता देण्यासंदर्भात १५ दिवसांची मर्यादा निश्चित करणे.

ह्या अत्यंत एकही नया पैशाच्या व अनुदानाशिवाय पतसंस्थांच्या मागण्या महाराष्ट्र राज्य सरकार गेली अनेक वर्षापासून सोडविण्यास तयार नाही.

याशिवाय रूपये १०००/- कोटींच्या खर्चांच्या आतमध्ये खालील अत्यंत महत्वाच्या बाबींची पुर्तता करणेसाठी व पतसंस्थांना मदत करणेसाठी राज्य सरकारने त्वरीत पावले उचलणे आवश्यक आहे. ते खालीलप्रमाणे ;-

१. बँकांप्रमाणे सहकारी पतसंस्थांसाठी डिपॉझीट गॅरंटी कारर्पोरेशनची स्थापना करणे.

२. बँकांप्रमाणे सहकारी पतसंस्थांना लेखापरिक्षण शुल्क लागू करणे.

३. सहकारी साखर कारखाने, सहकारी सूतगिरण्या, प्रक्रिया संस्था इत्यादींना केंद्र सरकारने नाबार्डच्या माध्यमातून महाराष्ट्र शासनाने पुढाकार घेवून ज्या पध्दतीने विविध पॅकेजेस दिली, थकबाकीदारांची कर्जे माफ करून त्यांची भरपाई शासनाने दिली, त्याच पध्दतीवर पतसंस्थांच्या थकबाकीसंदर्भात कार्यवाही करणे.

४. विशेष वसुली व विक्री अधिकारी यांचे चार्जेस शासनाला वर्ग करण्याच्या ऐवजी पतसंस्थांनाच वर्ग करणेबाबत. इत्यादी.

यापमाणे पतसंस्थांच्या खर्चाच्या / अनुदानाच्या / आर्थिक मदतीच्या वरीलप्रमाणे प्रमुख वर्षानुवर्षे विचार न केलेल्या मागण्या प्रलंबित आहेत. याविषयी सरकारने मूग गिळून बसण्याची भुमिका बजावणे जनतेच्या विरोधात आहे. आम जनतेला किंवा घटकाला जे संविधानाने अधिकार प्राप्त करून देलेले आहेत त्याची अंमलबजावणी सरकारने समानतेच्या न्यायव्यवस्थेमधून दिली पाहिजे अन्यथा एक दिवस लोकशाहीत व्याजासहित किंमत मोजावी लागेल.

जय हिंद ! जय महाराष्ट्र !! जय सहकार !!!